स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## पर्यावरण विभाग

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१
ई-मेल : save.environs@mbmc.gov.in

जा.क्र.मनपा/पर्यावरण/१७८/२०२४-२५ दि.१०/०१/२०२५

**प्रति,**
**सिस्टीम मॅनेजर**
**माहिती व तंत्रज्ञान विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**विषय : जाहिर आवाहन प्रसिद्धीबाबत.**

उपरोक्त विषयान्वये पतंग उडविण्यासाठी नायलॉन मांजा (प्लास्टिक किंवा सिंथेटिक धाग्यांचा) वापरामुळे अपघात होऊन मानव / पक्षी / प्राणी यांना इजा होत आहे. त्यामुळे नायलॉन मांजाची साठवणूक, घाऊक व किरकोळ विक्रीवर शासनाने बंदी घातलेली असून याकामी मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत जाहिर आवाहन करण्यात येत आहे.

तरी सोबत जोडलेले जाहिर आवाहन महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावे.

Gunijan

**(योगेश गुणिजन)**
**सहा. आयुक्त (पर्यावरण)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

D:\पर्यावरण विभाग\2024-25\पर्यावरणपूरक उत्सव 2024\नायलॉन मांजा बंदी\संगणक विभाग - जाहिर आवाहन प्रसिद्धी.docx

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## पर्यावरण विभाग

## // जाहिर सूचना //

**"नायलॉन मांजा वापरण्यास प्रतिबंध"**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये मकर सक्रांती सण साजरा करताना नागरिकांकडून पतंग उडविले जातात व यासाठी मोठ्या प्रमाणावर (प्लास्टिक किंवा सिंथेटिक धाग्यांचा) नायलॉन मांजा वापर करण्याची शक्यता आहे. या मांजामुळे मानवी अपघातासह पक्षांना मोठ्या प्रमाणावर इजा होऊन अनेक मानव / पक्षी / प्राणी यांना आपला जीव गमवावा लागतो. त्यामुळे नायलॉन मांजाच्या घाऊक व किरकोळ विक्रीवर शासनाने बंदी घातलेली आहे. तसेच यासंबंधित Animal Welfare Board of India यांनी सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

सबब, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना खालीलप्रमाणे जाहिर आवाहन करणेत येत आहे.

१. नायलॉन मांजाऐवजी पर्यावरण पूरक पर्यायांचा अवलंब करावा.

२. प्लास्टिक किंवा इतर कृत्रिम वस्तूपासून बनविलेल्या नायलॉन मांजाचा वापर टाळावा.

३. घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी तसेच साठवणूकदार यांनी तत्परतेने नायलॉन मांजाची विक्री, साठवणूक थांबविण्यात यावी. वर्षभरात त्याची साठवणूक, हाताळणी व विक्री होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

४. पतंग उडवितांना केलेल्या मांजाच्या वापरामुळे विजेच्या तारांवर घर्षण होवून आग लागणे, उपकेंद्रे बंद पडणे, वीज उपकरणे बिघडणे, अपघात घडणे, इजा व जिवीतहानी होणे, इ. बाबींचा विचार करता नायलॉन मांजाचा वापर करु नये.

५. नायलॉन मांजामुळे जखमी झालेल्या पशु पक्षी यांना उपचाराकरिता "पशु पक्षी केंद्र" उड्डाणपुला खाली, भाईंदर (प.) येथे दाखल करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका